**ठळक बातम्या**

- विकसित भारताच्या दिशेने महिलांनी परिवर्तनकारी भूमिका बजावली असून गेल्या ११ वर्षांत महिलांच्या विकासासाठी रालोआ सरकारचं भरीव कार्य

- अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात राज्याने उत्तम काम केलं आहे, असं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- काँग्रेस नेता राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेविषयी सार्वजनिक मंचावरुन बोलण्याऐवजी निवडणूक आयोगाशी थेट संवाद साधावा, असं केंद्रीय निवडणूक आयोगाचं आवाहन

- फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरी गटाच्या विजेतेपदासाठी आज स्पॅनिश खेळाडू कार्लोस अल्काराझ आणि इटलीच्या जेन्निक सिन्नर यांचा सामना रंगणार

**आणि**

- मुंबई-गोवा महामार्गावर निवळी घाटात बावनदीजवळ मिनी बस आणि एलपीजी वाहतूक करणारा टँकर यांच्या अपघातात सुमारे २० जण जखमी/ वायुगळती मुळे वाहतूक बंद

**<><><><>**

विकसित भारताच्या दिशेने महिलांनी परिवर्तनकारी भूमिका बजावली असून गेल्या ११ वर्षांत महिलांच्या विकासावरच रालोआ सरकारचं लक्ष केंद्रित असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. महिलांनी गेल्या ११ वर्षांत विज्ञान, शिक्षण, क्रीडा, स्टार्टअप्स, सशस्त्र दलं यांसह सर्व क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून सर्वांना प्रेरणा दिल्याचं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

सेवा, सुशासन आणि गरीबांचं कल्याण या तत्वांनी प्रेरित झालेल्या भारताने गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. या अकरा वर्षांच्या काळात महिलांच्या विकासावरही भर देण्यात आला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीने सुरू केलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून महिला सबलीकरणाच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल टाकलं आहे. याविषयी सविस्तर जाणून घेऊया..

**व्हॉईस कास्ट**

*प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात याचा उल्लेख केला आहे. विकसित भारताच्या दिशेने महिलांनी परिवर्तनकारी भूमिका बजावली असून गेल्या ११ वर्षांत नारी शक्तीवर रालोआ सरकारने विशेष लक्ष दिलं आहे. महिलांनी गेल्या ११ वर्षांत विज्ञान, शिक्षण, क्रीडा, स्टार्टअप्स, सशस्त्र दलं यांसह सर्व क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून सर्वांना प्रेरणा दिल्याचं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.*

*उत्तम पोषण मिळण्यासाठी सरकारने सुरू केलेल्या मिशन पोषण २.० या उपक्रमाद्वारे किशोरवयीन मुली तसंच मातांच्या पोषणावर भर दिला जात आहे. पोषणासह दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळावं यासाठी दोन लाखांहून अधिक अंगणवाडी केंद्रं सुरू करण्यात आली आहेत. आरोग्याच्या आघाडीवर जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम आणि जननी सुरक्षा योजना यांमुळे ग्रामीण आणि वंचित भागात सुरक्षित प्रसूती तसंच प्रसूतीसंबंधित आरोग्यासाठी सेवा उपलब्ध झाली आहे. स्वच्छ भारत अभियानांर्गत १२ कोटींहून अधिक शौचालयं बांधण्यात आली असून त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेत लक्षणीय वाढ झाली आहे. उज्ज्वला योजनेमुळे १० कोटींहून अधिक एलपीजी गॅसजोडण्या दिल्या गेल्या असून त्यामुळे अनेक स्वयंपाकघरं धूरमुक्त झाली आहेत. जलजीवन अभियानामुळे १५ कोटींहून अधिक घरांमध्ये नळाने पाणी पोहोचलं असून त्यामुळे महिलांना होणारा पाण्याच्या शोधाचा त्रास कमी झाला आहे. सुकन्या समृद्धी योजनेत ४ कोटी २० लाखांहून अधिक खाती उघडण्यात आली असून त्यामुळे मुलींसाठी आर्थिक सुरक्षितता निश्चित केली आहे.*

**<><><><>**

अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात राज्याने उत्तम काम केलं आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. पुणे जिल्ह्यातल्या औंध इथं महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या कोनशिलेचं अनावरण केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, मंत्री अतुल सावे उपस्थित होते. ही इमारत ग्रीन बिल्डिंगचा उत्तम नमुना आहे, ऊर्जा बचत करणारी आणि गरज असेल तेवढी ऊर्जा निर्माण करणारी आहे, असं मुख्यमंत्री वार्ताहरांशी बोलताना यावेळी म्हणाले.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप विविध वर्तमानपत्रात लेख लिहून केला होता, त्याला आपण लेख लिहूनच उत्तर दिलं असं मुख्यमंत्री यावेळी वार्ताहरांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले. राहुल गांधी यांनी निवडणुकीतला पराभव स्वीकारून आत्मपरीक्षण करावं. तसंच लोकांशी जोडून घेण्यात कुठे कमी पडलो हे पाहून त्यावर काम करायला हवं असं मुख्यमंत्र्यांनी या लेखात म्हटलं आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारच्या विकसित कृषी संकल्प अभियाना अंतर्गत धाराशिव जिल्ह्यात राजुरी इथं शेतकऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम झाला. यावेळी खरीप हंगामातल्या पिकांची बी-बियाणे प्रात्यक्षिकं, तसेच पिकांवर पडणाऱ्या रोग किडींचे व्यवस्थापन, नैसर्गिक शेती या विषयांवर कृषी उत्पन्न वाढवण्याच्या अनुषंगाने उपयुक्त माहिती देण्यात आली. तुळजापूरचं कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी विभागाच्या वतीने अभियान राबवण्यात येत आहे. कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. सचिन सूर्यवंशी यांनी सांगितलं….

**- - -होल्ड बाईट- सूर्यवंशी- -**

धाराशिव जिल्ह्यातल्या आठ तालुक्यात मिळून ५० गावांत हे अभियान राबवण्यात येत असून त्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्राची दोन पथकं दररोज सहा गावांना भेट देत आहेत. या उपक्रमाचा लाभ अनेक शेतकरी घेत आहेत. आता ऐकूया अरुण इंगळे या लाभार्थी शेतकऱ्याची प्रतिक्रीया....

**- - होल्ड बाईट- अरूण इंगळे- -**

**<><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सार्वजनिक मंचावरून निवडणूक प्रक्रियेविषयी आरोप करण्याऐवजी निवडणूक आयोगाशी थेट संवाद साधावा असं आवाहन निवडणूक आयोगाने केलं असल्याचं अधिकृत सूत्रांनी सांगितलं. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला होता, त्यावर निवडणूक आयोगानं पुन्हा एकदा हे आवाहन केलं. गांधी यांनी आपली तक्रार लिखित स्वरूपात द्यावी, तसंच प्रत्यक्ष येऊन भेटावं असं आयोगानं म्हटलं आहे. निवडणूक आयोगाने काँग्रेसला १५ मे रोजी भेटीचं आमंत्रण दिलं होतं, मात्र त्यांनी ही भेट टाळली.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
८ जून २०२५ - शनिवार

<><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुषांच्या अंतिम फेरीत आज स्पॅनिश खेळाडू कार्लोस अल्काराझ आणि इटालियन खेळाडू जेन्निक सिन्नर यांचा सामना होईल. जेन्निक सिन्नर जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आहे तर अल्काराझ फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेचा गतविजेता आहे. सामना संध्याकाळी साडेसहा वाजता सुरु होईल.

उपांत्य फेरीत सिनरनं नोवाक जोकोविचचा सरळ सेटमध्ये पराभव केला तर अल्काराझविरुद्ध लोरेन्झो मुसेट्टीनं पायाच्या दुखापतीमुळं सामन्यातून माघार घेतली होती.

महिला एकेरीत, अमेरिकन टेनिसपटू कोको गॉफनं काल रात्री झालेल्या रोमांचक अंतिम सामन्यात अव्वल मानांकित अरिना सबालेंकाचा ६-७, ६-२, ६-४ असा पराभव केला.

<><><><>

लावणी कलावंत महासंघानं यंदाचे लावणी गौरव पुरस्कार जाहीर केले असून शाहीरी परंपरेतले जेष्ठ शाहीर मधुकर खामकर यांना जीवनगौरव पुरस्कार घोषित केला आहे. लावण्यवती प्रज्ञा कोळी, शाहीर दत्ताराम म्हात्रे, गायिका वंदना निकाळे, पुरुष लावणी कलाकार आनंद साटम, निर्माते उदय साटम, वादक धीरज गोरेगांवकर, नृत्यदिग्दर्शक सुभाष नकाशे, निवेदक भरत उतेकर, लोककलेसाठी सुनिल ढगे, नेपथ्य तंत्रज्ञ म्हणून सुनील देवळेकर यांना लावणी गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. महासंघाच्या ११ व्या वर्धापनदिनानिमित्त येत्या २४ जूनला मुंबईत हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

<><><><>

मुंबई-गोवा महामार्गावर आज सकाळी रत्नागिरी जिल्ह्यातल्या निवळी घाटात बावनदीजवळ मिनी बस आणि एलपीजी वाहतूक करणारा टँकर यांची धडक होऊन अपघात झाला आणि मिनी बस रस्त्याच्या कडेला दरीत कोसळली. ही मिनी बस शिक्षकांना प्रशिक्षणासाठी रत्नागिरीला घेऊन येत होती. बसमधले ३१ जण जखमी झाले असून, त्यांच्यावर रत्नागिरीच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यामध्ये १५ पुरुष आणि १६ महिलांचा समावेश असून, दोन महिलांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आलं आहे.

दरम्यान, अपघातग्रस्त टँकरमधून एलपीजीची गळती होत असल्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांनी बावनदी भागात येऊ नये. पाली आणि संगमेश्वर इथून पर्याय मार्गांचा वापर करावा, असं आवाहन रत्नागिरी जिल्हा पोलीसांनी केलं आहे. वायुगळती होत असल्याने वाहतूक सध्या त्या भागातील वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे. वाहतूक सुरळीत सुरू होण्यासाठी कमीत कमी दोन ते तीन तास लागू शकतात. महामार्गाजवळची घरं, बाग, गोठा आणि वाहनं यांचंही या अपघातात नुकसान झालं. त्यात काही जनावरं जखमी झाली आहेत. घटनास्थळी पोलीस, अग्निशमन दलासह आपत्कालीन सेवा यंत्रणा दाखल झाल्या असून, वाहतूक सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

**//<><><><>//**